दिनांक ०७/०८/२०२३

# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक श्री. पवन परिहार, वय 30 वर्षे, पद- सहाय्यक नगर रचनाकार, नेमणुक- मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद ( वर्ग-2 ) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रक्कम 1,50,000/- रुपये मागणी केली व फिर्यादी यांचे वर संशय आल्याने आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही .

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पत्ता | :- | श्री. पवन परिहार, वय 30 वर्षे, पद- सहाय्यक नगर रचनाकार, नेमणुक- मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद ( वर्ग-2 ) |
| लाच मागणी रक्कम | :- | 1,50,000/-रुपये. तडजोडी अंती ठरलेली रक्कम-1,00,000/- रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे चिखलठाणा शेत गट क्रं. 377 मधील 17,100 स्केअर मिटर या जागेच्या विकासन करारनाम्याचे शासकिय मुल्यांकन निश्चित करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार हे समर्थ इन्फ्रा फर्म कन्स्ट्रक्शन च्या वतीने काम पाहतात त्यांचे चिखलठाणा शेत गट क्रं. 377 मधील 17,100 स्केअर मिटर या जागेच्या विकासन करारनाम्याचे शासकिय मुल्यांकन निश्चित करण्यासाठी आ.लो.से. श्री. पवन परिहार यांनी तक्रारदार यांना 1,50,000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.26/07/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. पवन परिहार यांनी फिर्यादी यांना तडजोडी अंती 1,00,000/- रुपये. मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 07/08/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. परिहार यांना तक्रारदाराची शंका आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांचे विरुध्द पो.स्टे. सिडको औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार आशोक नागरगोजे, कपील गाडेकर, राजेंद्र जोशी, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद
सत्यमेव जयते

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.